दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक ३९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१० मे २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# आपत्ती येऊच नये.. मात्र आलीच तर सज्ञता हवी : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**मनातील खरी इच्छा आहे ती आपत्ती येऊच नये अशी.. मात्र आलीच तर उद्भवलेल्या परिस्थितीस तोंड देण्याची आपली सर्व प्रकारची सज्ञता हवी आणि ही सज्ञता केवळ प्रशिक्षणामुळेच येऊ शकते, असे प्रतिपादन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी आज येथे केले.**



महासमादेशक, होमगार्ड, नागरी संरक्षण, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन व रायगड पोलीस यांच्या संयुक्त विद्यमानाने आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते पोलिस कवायत मैदान येथील जंजिरा सभागृहात संपन्न झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी अतिरिक्त नियंत्रक, नागरी संरक्षण, मुंबई संजय जाधव, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, प्रांताधिकारी प्रशांत ढगे, तहसिलदार श्रीमती मीनल दळवी, पोलीस निरीक्षक अरुण पवार, सहाय्यक पो–लीस निरीक्षक अजित गोळे, राज्य आपत्ती व्यवस्थापन दलाचे उपनिरीक्षक प्रकाश सोनटक्के, होमगार्ड पुरुष महिला जवान, आपत्ती प्रतिसाद दलाचे स्वयंसेवक श्री.गुरुनाथ साठलेकर आदी उपस्थित होते.

पालकमंत्री कु.तटकरे म्हणाल्या की, जिल्हा नियोजन, स्थानिक आमदार निधी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या एकत्रित निधीतून जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक साधनसामुग्री मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देण्यात आली आहे. या साधनसामुग्रीचा जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापनासाठी निश्चितच उपयोग होऊ शकेल. पोलीस विभागासाठी लवकरच बहुउद्देशीय सभागृह उभारले जाणार आहे. नुकतेच जिल्हा नियोजनच्या निधीतून पोलीस विभागासाठी नवी वाहने देण्यात आली आहेत.

पोलीस विभागातील अधिकारी–कर्मचाऱ्यांसाठी ओपन जिम तसेच महिलांसाठी देखील जिमची स्वतंत्र निर्मिती करण्यात येईल. जिल्ह्यासाठी रॅपिड रेस्क्यू वेहिकल लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापनाकरिता सर्वतोपरी सहकार्य केले जाईल.

महाड येथे आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष स्थापन होण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू आहे. मदत व पुनर्वसन विभागाच्या सहकार्याने महाड येथे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचा कायमस्वरूपी बेसकॅम्प स्थापित होण्याच्या दृष्टीने केंद्राकडे पाठपुरावा सुरू आहे, असे सांगून पालकमंत्री कु.तटकरे यांनी आयोजकांना सूचित केले की, आपत्तीच्यावेळी विमोचन कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, स्वयंसेवक आणि जिल्हा प्रशासनाची विमोचन पथके यांचे एकत्रित प्रशिक्षण व बैठका घेण्यात याव्यात, जेणेकरून प्रशासन व या विमोचन कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था व स्वयंसेवक यांचा आपापसात उत्तम समन्वय साधला जाईल आणि त्यातून आपत्ती व्यवस्थापन कार्यात सुसूत्रता येईल.

यावेळी अतिरिक्त नियंत्रक जाधव यांनी आपल्या मनोगतात आपत्ती व्यवस्थापन आणि त्यासाठीच्या प्रशिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करून प्रशिक्षणाच्या माध्यमातून जास्तीत जास्त स्वयंसेवक घडविले जातील, अशी ग्वाही दिली.

या प्रशिक्षण शिबिराच्या निमित्ताने पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेल्या प्रशिक्षण साहित्याचे परिक्षणही केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी केले.

# मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर टँकर पलटी, भीषण अपघातात ३ ठार

**दै.रायगड नगरी । मुंबई**



मुंबई–पुणे एक्स्प्रेस वेवरील अपघातांची मालिका काही केल्या थांबताना दिसत नाही. काही दिवसांपूर्वी एक केमिकल घेऊन जाणारा टँकर पलटी झाल्याने येथे मोठी वाहतूक कोंडी झाली होती. आता पुन्हा एकदा एक्सप्रेस वेवरील बोरघाटात आज (९ मे) सकाळच्या सुमारास भीषण अपघात झाला. या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला आहे. मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या मार्गावरुन भरधाव येणाऱ्या केमिकल टँकरवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला.

प्रोपेलीन गॅस वाहून नेणारा टँकर आज सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास पुण्याच्या दिशेने निघाला होता. त्याचवेळी, बोरघाटातील खोपोली एक्झिटनजीक गॅस टँकरवरील चालकाचा ताबा सुटल्याने तो टँकर पलटी झाला. रस्त्यावर पलटी झाल्यानंतरही गॅस टँकरने पलिकडच्या लेनमधून मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावरील दोन गाड्यांना धडक दिली. या धडकेत तीन प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. त्यापैकी दोघांची ओळख पटली असून तिसऱ्या मृताचं नाव अद्याप समजू शकलेलं नाही. सागर जनार्दन देशपांडे, (वय ५१ वर्षे), योगेश बी सिंह (वय ४७ वर्षे, रा. पुणे) अशी ओळख पटलेल्या मृतांची नावं आहेत. अपघाताची माहिती मिळताच बोरघाट पोलीस यंत्रणा, देवदूत यंत्रणा आणि सामाजिक संस्था घटनास्थळी दाखल झाले होते. तर, या अपघातामुळे गॅस टँकरमधील गळतीची तपासणी करण्यासाठी केमिकल तज्ज्ञांनाही पाचारण करण्यात आले. दरम्यान, या अपघातामुळे मुंबई–पुणे एक्सप्रेस महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. मात्र, संबंधित यंत्रणांनी क्रेनच्या सहाय्याने टँकर बाजुला हटविला. त्यानंतर, वाहतूक पूर्ववत सुरू करण्यात आली आहे. जवळपास ३ तासानंतर वाहतूक पूर्ववत झाल्याने महामार्गावर अडकून पडलेल्या प्रवाशांचा जीव भांड्यात पडला.

# गडब येथे बस चालकास टेम्पोची धडक : बस चालक ठार

**दै.रायगड नगरी । पेण**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर गडब येथील ग्रीन पार्क हॉटेल जवळ उभे असलेले खासगी बस चालक सुनीलकुमार राजेश्वर सिंह (वय ५४ वर्षे, राहणार–०३, गुरुकृपा अपाटमेंट, कोपरी, विरार) यांना छोटा हत्ती टेम्पोने ठोकर मारल्याने त्यांचा मृत्यू झाला आहे.

सुरेश कृष्णा जाधव, (५० राहणार– धामनंद तालुका खेड, रत्नागिरी सध्या राहणार– व्ही.के.रोड मुलुंड) हा हा त्याच्या ताब्यातील छोटा हत्ती टेम्पो क्रमांक एम. एच ०३ए.एच. ९१२३ हा महाड बाजूकडून मुंबई कडे जात असताना गडब गावच्या हद्दीत ग्रीन पार्क हॉटेल जवळ आल्यावेळी आपल्या ताब्यातील टेम्पो भरधाव वेगात चालवत असताना मुंबई गोवा या राष्ट्रीय महामार्गावर महालक्ष्मी नामक खासगी बस क्रमांक एम. एच. ०४ एफ. के. ३१०९ ही उभी असताना त्याचा चालक सुनीलकुमार राजेश्वर सिंह हे बस मधून उतरून रस्त्यावर उभे असताना त्यांना छोटा हत्ती टेम्पोने दिनांक ९ मे २०२२ रोजी पहाटे धडक दिली.

या धडकेत ते गंभीररीत्या जखमी झाल्याने त्यांचा त्यात मृत्यू झाला आहे. तसेच मयत यांच्या सोबत असणारे दीपक पांडुरंग कदम(४३ वर्षे, एम जी रोड, तीन डोंगरी, पोलीस वसाहती बाजूला, गोरेगाव, मुंबई) हे जखमी झाले आहेत. याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

याबाबत अधिक तपास पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार देसाई करीत आहेत

## संक्षिप्त...

### मला जातीयवादी म्हणून हिणवलं गेलं त्या विनोदी वक्तव्याचा मी आस्वाद घेतला : शरद पवार



**सातारा । वृत्तसंस्था**

साताऱ्यात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ६३व्या पुण्यतिथीनिमित्त राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार साताऱ्यात आले होते. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी ज्यांनी मला जातीवादी म्हणून हिनवले त्या विनोदी वक्तव्याचा मी आस्वाद घेतला. अशा प्रकारची विधानं करण्यामुळे लोक हसतात. अशी विधान लोक गांभीर्याने घेत नाहीत. लोक ऐकतात आणि सोडून देतात असे सांगत पवारांनी टिकाकारांना टोला लागवला आहे.

ओबीसी आरक्षणाबाबत मुख्यमंत्री आणि जाणकार याबाबत योग्य निर्णय घेतील. जो सगळ्यांना मान्य असेल असाच निर्णय होईल याची अंमलबजावणी कधी होईल याच्याकडे आमचं लक्ष राहील असे पवार म्हणाले. महाविकास आघाडीला भाजप टार्गेट करत आहे. सत्ता मिळवण्यासाठी त्यांना झोपसुद्धा येत नाही. सत्ता मिळवण्यासाठी महाविकास आघाडीला टार्गेट करणे हा कार्यक्रम त्यांचा आहे. ही आघाडी जसजशी पुढे जाईल तसे भाजप मागे जाईल. त्यामुळे महाविकास आघाडीकडे भाजपचे लक्ष आहे असे सांगत भाजपवर शरद पवार यांनी निशाणा साधला.

आज देशात महागाई वाढली आहे, बेकारी वाढली आहे. या विषयाकडे न पाहता भोंग्याचे विषय घेतले जातात. ज्यांना आधार नाही ते अशी लोकांची मन भरकटवण्याचा प्रयत्न करतात, अशी नाव न घेता राज ठाकरेंवर पवारांनी टीका केली आहे.

## रयत शिक्षण संस्थेच्या विकासात भरीव योगदान देणारे

# लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबियांचा रयत शिक्षण संस्थेच्यावतीने हृद्य सत्कार



**दै.रायगड नगरी । सातारा**

ज्ञानाच्या आधाराशिवाय प्रगती होत नाही त्यामुळे ती संधी प्रत्येकाला मिळाली पाहिजे हे उद्दिष्ट पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांचे राहिले, त्यामुळेच रयत शिक्षण संस्था देशातील एक नंबरची संस्था झाली असून लोकनेते रामशेठ ठाकूर या संस्थेच्या कार्याला मदतीचा हात खुल्ला करून देत असतात, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी आज (दि.०९) सातारा येथे केले.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा ६३ वा पुण्यतिथी कार्यक्रम त्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून दानशूर व्यक्तींचा सन्मान, गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.त्याचबरोबर संस्थेतील उत्कृष्ट शाखांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यावेळी खासदार शरद पवार बोलत होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ.अनिल पाटील, व्हाईस चेअरमन भगीरथ शिंदे, मॅनेजिंग कौन्सिल चे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सचिव विठ्ठल शिवणकर, साताऱ्याचे पालकमंत्री बाळासाहेब पाटील, कृषी राज्य मंत्री विश्वजित कदम, खासदार श्रीनिवास पाटील, खासदार सुप्रिया सुळे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार आशुतोष काळे, आमदार शशिकांत शिंदे, संस्थेचे सहसचिव संजय नागपुरे, ऑडिटर शिवलिंग मेनकुदळे, तसेच जनरल बॉडी सदस्य अरूणशेठ भगत, पनवेल महानगरपालिका सभागृह नेते परेश ठाकूर, पी.जे.पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य महेंद्र घरत, पदाधिकारी आणि रयत सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

.../२

# मुंबई सत्र न्यायालयाने राणा दाम्पत्याला बजावली नोटीस

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोर्टानं घालून दिलेल्या अटी आणि शर्थींवर जामीनावर सुटलेल्या अमरावतीच्या खासदार नवनीत राणा तसेच त्यांचे पती आमदार रवी राणा यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कारण मुंबई सत्र न्यायालयानं आता राणा दाम्पत्याविरोधात कारणे द्या नोटीस बजावली आहे. कोर्टानं घालून दिलेल्या अटी आणि नियमांचं उल्लंघन केल्याप्रकरणी तुमच्या विरोधात अजमीनपात्र वॉरंट का जारी केलं जाऊ नये? यावर उत्तर देण्यास राणा दाम्पत्याला बजावण्यात आलं आहे.



राणा दाम्पत्याला सत्र न्यायालयानं जामीन देताना काही अटी घालून दिल्या होत्या. यात राणा दाम्पत्याला माध्यमांशी बोलण्यास मज्जाव करण्यात आला होता. तरीही काल आणि आज राणा दाम्पत्यानं प्रसार माध्यमांसमोर आपली प्रतिक्रिया देत ठाकरे सरकावर जोरदार हल्लाबोल केला. राणा दाम्पत्याच्या याच कृतीची दखल कोर्टानं घेतली असून त्यांच्याविरोधात नोटीस जारी केली आहे. दुसरीकडे मुंबई पोलिसांनी देखील सत्र न्यायालयात राणा दाम्पत्याविरोधात अर्ज दाखल केला असून दोघांनी प्रसार माध्यमांसमोर वक्तव्य करुन अटींचं उल्लंघन केलं आहे असं नमूद केलं आहे. जामीन देताना घालून देण्यात आलेल्या अटी त्यांनी पाळलेल्या नाहीत त्यामुळे राणा दाम्पत्याविरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी करावे असे मुंबई पोलिसांनी म्हटलं आहे.

# १२ वीचा निकाल १० जूनपर्यंत, तर दहावीचा निकाल २० जूनपर्यंत जाहीर होणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात इयत्ता १२ वीचा निकाल १० जूनपर्यंत तर इयत्ता १० वीचा निकाल २० जूनपर्यंत जाहीर केला जाईल अशी माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दिली आहे. दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेच्या पेपर तपासणीचं काम जवळपास पूर्ण झालं आहे. आता दहावी आणि बारावीच्या परीक्षेच्या निकाल तयार करण्याचं काम सुरू आहे. त्यामुळे १० जूनपर्यंत इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर करणार असून दहावीचा निकाल २० जूनपर्यंत जाहीर केला जाईळ, अशी माहिती शिक्षण मंडळानं दिली आहे.

शिक्षकांच्या पेपर तपासणी बहिष्कारामुळे निकाल उशिरा लागण्याची चिंता विद्यार्थी आणि पालकांना होती. पण जून महिन्यातच दोन्ही परीक्षांचे निकाल लागणार असल्याची माहिती बोर्डाकडून दिली आहे. परीक्षेतील शेवटच्या पेपरच्या ६० दिवसांनंतर निकाल जाहीर करण्याची प्रमाणिक प्रक्रिया आहे. पण यावेळी इयत्ता बारावीची परीक्षा पंधरा दिवस उशिरा सुरू झाली होती.

त्यामुळे बारावीचा निकाल १० जूनपर्यंत जाहीर होईल, असं बोर्डानं म्हटलं आहे. तसंच बारावीचा निकाल लागल्याच्या १० दिवसांनंतर इयत्ता दहावीचा निकाल जाहीर केला जाण्याची शक्यता आहे.

गेल्या वर्षी कोरोना परिस्थितीमुळे परीक्षा होऊ शकल्या नव्हता. तर यंदा दहावीच्या परीक्षा १५ मार्च २०२२ पासून सुरू झाल्या होत्या. तर ४ एप्रिल २०२२ रोजी संपल्या होत्या. यंदा दहावीच्या परीक्षेसाठी एकूण १६ लाख ३९ हजार १७२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यातील ८ लाख ८९ हजार ५८४ विद्यार्थी आणि ७ लाख ४९ हजार ४८७ विद्यार्थिनींनी परीक्षा दिली होती.

दरम्यान, इयत्ता दहावी आणि बारा–वीचे निकाल वेळेवर लागतील असं आश्वासन शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी देखील दिलं होतं. त्यामुळे आता शिक्षण बोर्डानंच निकालांची संभाव्य तारीख जाहीर केल्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांसमोर चिंता काहीशी मिटली आहे.

# पनवेलमध्ये व्यवसाय आणि अर्थसहाय्य मार्गदर्शन शिबिराचा शुभारंभ

## जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचा स्तुत्य उपक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पनवेल मध्ये प्रथमच पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या संकल्पनेतून एका छत्राखाली व्यवसाय आणि अर्थसहाय्य शिबिराचे आयोजन ज्यात केंद्र सरकारचे विविध कोर्सेस ची माहिती देण्यासाठी संबंधित विभागातील अधिकारी उपस्थित होते. तसेच कोर्स पूर्ण झाल्यावर आवश्यक ते परवाने काढण्यासाठी नियोजन असल्याने कोर्स पूर्ण करून परवाने काढल्यानंतर स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार मार्फत ज्या विविध सबसिडी कर्जही मिळतील. ते मिळण्यासाठी योग्य मार्गदर्शन करण्यासाठी विविध नॅशनलाईज बँकांचे प्रतिनिधी सुद्धा मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित होते. हे शिबिर युवक, महिला आणि तृतीय पंथी अशा प्रत्येक स्तरातील नागरिकांसाठी मोफत आयोजित करण्यात आले होते.

शेतकरी कामगार पक्ष, जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था व लक्ष्यपूर्ती वेलफेअर फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने व्यवसाय व अर्थसहाय्य मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मार्गदर्शन घेणाऱ्या सदस्यांना व्यवसाय आणि अर्थसहाय्य मार्गदर्शक म्हणून खादी ग्रामोद्योग आयोगाचे नारायण कांबळे सर व राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळचे कांतायन जिन्हा, तसेच इंडियन चेंबर ऑफ इंटरनॅशनल बिझनेसचे केलविन मेहता, तंत्राज हेल्थ केअर ब्युटी वेलनेस संचालिका डॉ.पल्लवी शिंदे, नॅशनलाईज बँकेचे सल्लागार, रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सौ.सोनल पाटील अश्या विविध क्षेत्रातील तज्ञ मान्यवरांची उपस्थिती मध्ये मार्गदर्शन शिबिर पार पडले.

यावेळी अनेक लघु उद्योजकांना त्यांच्या यशस्वी कारकिर्दी बद्दल सन्मान देऊन त्यांच्या अनुभवातून आणि प्रेरणादायी मार्गदर्शनातून

.../२

# कायद्याचे रक्षक की टोळीयोद्धे?

दिल्लीतील भारतीय जनता पक्षाचे नेते तेजिंदर पाल सिंग बग्गा यांची अटक, नंतरची सुटका आणि आता पंजाब व हरयाणा उच्च न्यायालयाने मध्यरात्री सुनावणी घेऊन त्यांच्या विरोधात कोणतीही पोलिस कारवाई करण्यास दिलेली स्थगिती.. या घटनाक्रमावरून भारतात केंद्र आणि राज्ये किंवा दोन राज्ये यांच्यात किती पराकोटीचा संघर्ष उफाळला आहे, याची खात्री पटावी. महाराष्ट्रातही काही वेगळे चाललेले नाही. आपल्या हातातल्या सगळ्या यंत्रणा वापरून प्रतिपक्षाला पुरते नामोहरम करायचे, हे फक्त युद्धात होते. पण तिथेही काही नीतीनियम असतात. तेवढाही संयम आज राहिलेला नाही. बग्गा हे दिल्ली भाजपचे राजापेक्षा राजनिष्ठ आणि जिभेला हाड नसलेले नेते आहेत. मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला काही दिवसांपूर्वी हिरव्या दिव्यांची रोषणाई केली होती. तेव्हा या बग्गा महाशयांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचे 'मोहम्मद उद्धव ठाकरे' असे वर्णन केले. ते दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याही विरोधात असेच शिवराळ बोलतात. त्यांच्या अशा वक्तव्याबद्दल गुन्हा दाखल झाला. मोहाली न्यायालयाने अटक वॉरंट बजावले. पंजाबचे पोलिस ते बजावण्यासाठी दिल्लीत पोहोचले आणि त्यांनी या वॉरंटची तामिली करीत बग्गा यांना ताब्यात घेऊन पंजाबकडे चालवले. वाटेत हरयाणाची हद्द लागते. तेथे कुरुक्षेत्र पोलिसांनी या पोलिस पार्टीला अडवले आणि ठाण्यात नेले. दरम्यान, दिल्ली पोलिसही कामाला लागले. या संघर्षात दिल्ली पोलिसांनी बग्गांना पंजाबात जाऊ न देता राजधानीत परत आणले. दिल्लीत आम आदमी पक्षाची सत्ता असली तरी दिल्ली पोलिस हे केंद्र सरकारच्या अखत्यारीत आहेत. पंजाबात 'आप'ची सत्ता आहे; तर हरयाणात भाजपचे सरकार आहे. हे राजकीय गणित लक्षात घेतले की, राजकीय मालकांची मर्जी राखण्यासाठी विविध राज्यांचे पोलिस कसे कोणत्याही थराला जातात, हे उमजते. केंद्र आणि विविध राज्य सरकारे किंवा तेथील सत्ताधारी यांच्यात हा जो भयंकर संघर्ष चालला आहे; तसा संघर्ष केवळ गृहयुद्ध भडकते, तेव्हाच होत असतो. दुर्दैवाने, या संघर्षात पोलिस यंत्रणा, नोकरशाही, न्यायालयीन यंत्रणा हे सारे गुंतले आहेत. हे देशाच्या भल्याचे आहे का, याचा विचार करायला सूडनाट्य कलाकारांना सवड नाही. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे सुसंस्कृतपणाचा उत्तम अभिनय करतात. त्यांच्या पक्षाच्या पंजाब सरकारने दिल्लीत येऊन बग्गा यांना अटक करण्याची काय गरज होती? कोणत्याही संशयितावर इतर राज्यांत कारवाई होते, तेव्हा त्याचे नियम असतात. आता पंजाब पोलिस सांगतात की, दिल्लीतील पोलिस ठाण्याला कल्पना दिली होती. मग ते पोलिस कुरुक्षेत्रपर्यंत पाठलाग करत का आले? हरयाणा पोलिसांनी पंजाब पोलिसांच्या तुकडीला का अडवले? सुदैव इतकेच की, या तीन पोलिस दलांमध्ये सशस्त्र संघर्ष पेटला नाही. मागच्या वर्षी आसाम आणि मिझोराम पोलिसांच्या सशस्त्र संघर्षात सहा पोलिसांचा बळी गेला. तरीही, भाजपची सत्ता असलेल्या आसाम सरकारने संयम बाणवलेला नाही. नाहीतर, त्यांनी गुजरातचे अपक्ष आमदार जिग्नेश मेवाणी यांना गुजरातेत येऊन अटक केली नसती. मेवाणी यांचा गुन्हा काय होता? तर पंतप्रधान मोदी यांच्या विरोधात केलेले चिथावणीखोर ट्वीट. आसाम, महाराष्ट्र, पंजाब, हरयाणा, दिल्ली येथील सगळी गुन्हेगारी संपून तेथे रामराज्य आले आहे का? मग पोलिस दले आपली इतकी शक्ती केवळ सूडबाजीत का वाया घालवत आहेत? आज केंद्र आणि राज्ये यांच्यात कोण सत्तेवर आहे आणि कुणाची कोणाशी खुन्नस आहे, हे प्रश्न फार महत्त्वाचे नाहीत. यातून भारतीय संघराज्याच्या चौकटीला वारंवार जे धक्के बसत आहेत; ते मात्र क्षम्य नाहीत. पोलिस दलांना असे बेमुर्वत वापरणाऱ्या सगळ्या सत्ताधाऱ्यांनी जरा जगात काय चालले आहे ते पाहावे. भारतात लोकशाही आणि संघराज्याची रचना टिकवायची असेल तर दिल्ली, पंजाब आणि हरयाणा या तीन पोलिस दलांनी मिळून जे 'सडकनाट्य' सादर केले; ते अखेरचे ठरायला हवे. सध्या समाज माध्यमांवरील विधाने किंवा भाषणे, इशारे यांच्यासाठी सर्रास राज्यघटनेतील अतिशय गंभीर कलमे पोलिस दले वापरत आहेत. बग्गा यांच्या प्रकरणात हेच झाले. महाराष्ट्रातही हेच चालू आहे. केंद्र सरकारही वेगळे वागत नाही. हे काय चालू आहे? राज्यघटनेचा वापर राजकीय सूडबाजी करण्यासाठी कसा काय होऊ शकतो? आज सामान्य माणसांची न्यायालयातील फिर्याद वर्षानुवर्षे खितपत पडते; पण अशा राजकीय खटल्यांसाठी अपरात्री काम करण्याची कार्यक्षमता विविध न्यायालये दाखवतात. बग्गा प्रकरणात हेच झाले. या उच्च न्यायालयांनी आणि गरज पडली तर सर्वोच्च न्यायालयाने राज्यघटना आणि दंडविधानातील कलमे सारासार विवेक वापरून लावा; अशी सक्त ताकीद सर्वांना द्यावी. अन्यथा, कायद्याचे रक्षक सूडनाट्यातले कसबी कलावंत आणि मुकी बिचारी जनता असहाय प्रेक्षक, हेच चित्र देशात कायम दिसत राहील.

## मि जो घडलो, तो कै.अशोकशेठ लोखंडे यांच्यामुळे : खा.सुनील तटकरे



**दै.रायगड नगरी । तळा**

मि जो घडलो, तो कै.अशोकशेठ लोखंडे यांच्यामुळे असे सांगत खासदार सुनील तटकरे यांनी कै.अशोकशेठ लोखंडे यांच्याविषयी भावना व्यक्त केल्या. कै. अशोकशेठ लोखंडे यांचा चौतिसावा स्मृतिदिन समारंभ अशोक ल.लोखंडे विद्या मंदिर पिटसई येथे साजरा करण्यात आला यावेळी प्रमुख पाहुणे रायगड रत्नागिरीचे खासदार सुनील तटकरे यांनी कै.अशोकशेठ लोखंडे यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त केली.

या स्मृतिदिन समारंभात तटकरे म्हणाले की, कै.अशोकशेठ लोखंडे यांचे योगदान माझ्या आयुष्यात खूप मोठे आहे. त्यांच्या विषयी भावना शब्दात व्यक्त करता येणार नाही.आज मी जो उभा आहे तो अशोकशेठ लोखंडे यांच्या मुळेच.अशोक ल. लोखंडे विद्यामंदिर या शाळेने कुठलीही अपेक्षा न करता केवळ विद्यार्थी घडवण्याचे काम केले विद्यार्थ्यांमध्ये नैसर्गिक उपजत असलेले गुण याच्यामध्ये बदल न करता त्या विकसित करून विद्यार्थ्यांना पुढे नेण्याचे काम ही शाळा करत आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांनी संपूर्ण देशात तळा तालुक्याचे नाव लौकीक करावे असे त्यांनी यावेळी सांगितले. मी एक ठराविक रक्कम या शाळेला देणार आहे. या रक्कमेच्या येणाऱ्या व्याजाने शिक्षकांनी परीक्षांमध्ये उत्तम गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करावा असे त्यांनी यावेळी सांगितले.त्याचप्रमाणे मालूक पिटसई कोंड रस्ता आणि राहटाड वाडी ते राहटाड रस्ता येत्या कालावधीत जिल्हा नियोजन मधून पूर्ण करून घेऊ जेणे करून विद्यार्थ्यांना शाळेत येण्यास सुलभ होईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## एलईडी टीव्ही दिल्या नाहीत म्हणून पेट्रोल पंपा जवळ दोघांनी केली मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दोन एलईडी टीव्ही दिल्या नाहीत त्या गोष्टीचा राग मनात धरून एचपी पेट्रोल पंप सुकापुर येथे बांबूने ३८ वर्षीय इसमास मारहाण केल्याची घटना घडली आहे. आरोपी विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे.

उसरली बुद्रुक येथील संदीप धर्मा डोंगरकर हा आरसी कंपनीचा टेम्पोत ऑर्डरप्रमाणे इलेक्ट्रॉनिक वस्तू गोडाऊन मधून भरून ग्राहकांच्या घरी पोहोच करण्याचे काम करतो. ६ मे रोजी तो ग्राहकांना वस्तू पोहोच करण्यासाठी निघाला होता. डिझेल भरण्यासाठी सुकापुर येथे जात असताना मोटरसायकलवरून प्रणय बळीराम भोपी व प्रीतम बळीराम भोपी हे त्याच्याजवळ आले. व टेम्पो मधील दोन एलईडी टीव्ही काढून देण्यास सांगत होते. मात्र एलईडी टीव्ही कंपनीने विकलेल्या ग्राहकांच्या आहेत असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी त्याला मारण्याची धमकी दिली व ते तिथून निघून गेले. दुपारी तीनच्या सुमारास स्विफ्ट कार क्रमांक एम एच ४६ बिव्ही ७८७४ मधून पेट्रोल पंपावर येऊन ते खाली उतरले व बांबू हातामध्ये घेऊन शिवीगाळ व दमदाटी केली. व संदीप याच्या डोक्यात व पायावर मारले तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यात संदीप डांगर कर जखमी झाला आहे. त्याच्यावर गांधी हॉस्पिटल पनवेल येथे उपचार सुरू आहेत

## कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गातील वायूविजनचे काम सुरू पावसाळ्याचापूर्वी एका भुयाराची चाचणी होऊन वाहतुकीस प्रारंभ?

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६वरील कशेडी घाटाला पर्यायी भुयारी महामार्गाचे काम युध्दपातळीवर सुरू असून सध्या एका भुयारातील वायुविजनाचे म्हणजेच व्हेंटीलेशनचे काम सुरू झाले आहे. या दोन भुयारांपैकी एका भुयाराची चाचणी पावसाळ्यापूर्वी केली जाऊन वाहतुकीस प्रारंभ करण्यासंदर्भात हालचालींना वेग आला असून तीन पदरी भुयारांमध्ये समोरासमोर वाहतूक सुरू ठेवणे धोक्याचे असल्याच्या तज्ज्ञांच्या मतामुळे दोन्ही भुयारे एकाचवेळी सुरू करण्याचाही निर्णय होण्याची शक्यता असल्याचे याठिकाणी काम करणाऱ्या महत्वाच्या व्यक्तींनी सांगितले आहे.



मुंबई ते गोवा राष्ट्रीय महाम ार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाचे ढोबळ मानाने सात भाग करण्यात आले असून रायगड जिल्ह्यात इंदापूर ते वडपाले (माणगाव बायपास प्रस्तावित) २४ कि.मी., वीर ते भोगाव खुर्द ४० कि.मी., भोगाव खुर्द ते खवटी १४ कि.मी. (रत्नागिरी ता. खेड) ५०० कोटी रूपये अंदाजे खर्च (१.७ कि.मी भुयारी मार्ग),तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील ४४ कि.मी. रस्ता चौपदरीकरण अंदाजे खर्च ५७९ कोटी रूपये, चिपळूण तालुक्यातील ३८ कि.मी. रस्ता चौपदरीकरण अंदाजे खर्च ६७० कोटी रूपये, संगमेश्वर तालुक्यातील ४० कि.मी. रस्ता चौपदरीकरण अंदाजे खर्च ५९२ कोटी रूपये (आर–वली आणि सोनवी), रत्नागिरी ते लांजा ५१ कि.मी. रस्ता चौपदरीकरण अंदाजे खर्च ८२६ कोटी रूपये, राजापूर तालुक्यातील ३५ कि.मी. रस्ता चौपदरीकरण अंदाजे खर्च ६६० कोटी रूपये (राजापूर आणि वाकेड), याखेरिज, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील ३८ कि.मी. रस्ता चौपदरीकरण अंदाजे खर्च ४५० कोटी रूपये (बेलना व पियाली), कुडाळ तालुक्यातील ४४ कि.मी. रस्ता चौपदरीकरण अंदाजे खर्च ५७९ कोटी रूपये (गड, बन्सल आणि पिडवल),असे हे सात भाग असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. यापैकी रायगड जिल्ह्यातील वीर ते भोगाव खुर्द ४० कि.मी. महामार्ग आणि भोगाव खुर्द ते खवटी १.७ कि.मी भुयारी मार्ग हे दोन महत्वाचे टप्पे पोलादपूर तालुक्याशी संबंधित आहेत.

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ चे चौपदरीकरण सुरू असून या कशेडी घाटामध्ये रस्त्याचे चौपदरीकरण शक्य नसल्याने भारतीय पध्दतीचा भुयारी मार्ग खणून रस्ता करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या घाटातील प्रस्तावित ३.४४ किलोमीटर लांबीचा बोगदा (१.७ कि.मी.लांबीचे दोन भुयारी मार्ग) तयार करण्याचे काम रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने निविदा मंजूर झाल्याने स्विकारले असून ४४१ कोटी रुपयांचा खर्च याकामी होणे अपेक्षित आहे. मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ म्हणजेच पुर्वीचा मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ च्या पुनर्वसन आणि सुधारणेसाठी रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने २०१८ यावर्षी अभियांत्रिकी प्रॉक्युअरमेंट आणि कन्स्ट्रक्शन यांच्यासोबत ५०२ कोटी ४५ लाख रुपयांचा करार केला आहे. त्यामुळे कशेडी घाटातील प्रस्तावित बोगदा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बनविताना तीन पदरी दोन भुयारी मार्ग तयार करण्यात येत आहेत. यातील करारानुसार ७.२ किलोमीटर लांबीचा आधुनिक दर्जाचा पक्का रस्ताही प्रस्तावित करण्यात आल्यानुसार लवकरच या रस्त्याचे कामही सुरू होणार आहे. यावर्षी २०२२ मध्ये या भुयारी मार्गापर्यंत जाणाऱ्या काँक्रीट रस्त्याचे तसेच भुयाराच्या आतील भागातील काँक्रीटीकरणासह खेडबाजूकडे ४ पूल आणि पोलादपूरबाजूकडे तीन पुल उभारण्याचे काम झाल्यानंतर ॲप्रोच रस्ता पूर्ण होणार आहे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरचे पोटठेकेदार शिंदे डेव्हलपर्स कंपनी या कामासाठी युध्दपातळीवर प्रयत्नशील असल्याचे दिसून येत आहे.

दोन्ही भुयारी मार्गांची आपसात जोडणी राहण्यासाठी कनेक्टीव्हीटीचा भुयारी मार्ग पूर्ण झाला आहे. आतील भागात परत युटर्न घेणाऱ्या वाहनांसह अपघातग्रस्त वाहनांना बाहेर काढण्याची सुविधा या कनेक्टिव्हिटी भुयारी मार्गाने होणार आहे. यासोबत आपत्कालामध्ये उपयुक्त असलेले वायुविजन म्हणजे व्हेंटीलेशनच्या सुविधेचे एक भुयार तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे. कशेडी भागातील डोंगरातून या भुयारी मार्गाचे व्हेंटीलेशनचे उभे भुयार थेट डोंगरावर चौथरा करून बांधले जाणार असून या वायुविजन भुयारामधून हवा येऊ शकेल; मात्र, पावसाचे पाणी अथवा संततधार भुयारी मार्गात कोसळणार नाही, असे व्हेंटीलेशनचे स्वरूप असणार आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटात पावसाळ्यामध्ये दरडी कोसळण्याची शक्यता असल्याने भुयारी मार्गापैकी एक भुयारी मार्ग खुला करण्यासाठी अभियंते प्रयत्नशील आहे. या भुयाराची चाचणी येत्या पावसाळ्यापूर्वी केली जाणार असली तरी तज्ज्ञांच्यामते तीन पदरी रस्त्यांच्या या भुयारामधून वाहने समोरासमोर येतील, अशी वा–हतूक सुरू ठेवल्यास अपघातांचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने दोन्ही भुयारी मार्ग एकाचवेळी सुरू केल्यास मुंबईकडे जाणारी वाहने एका भुयाराने तर दुसऱ्या भुयारीमार्गाने रत्नागिरीकडे जाणारी वाहतूक सुरू ठेवता येणार असल्याचे मत या वाहतुकीसंदर्भात तज्ज्ञांनी व्यक्त केल्याने यंदाच्या पावसाळ्यात एका भुयारी मार्गाची चाचणी होऊनही भुयारी मार्गाने वाह–तूक सुरू होण्याची शक्यता दिसून येत नाही.

## महेंद्र घरत यांनी सातारा येथील डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या समाधीस्थळाला केले अभिवादन

**दै.रायगड नगरी । माथेरान**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मश्री डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आज दि ९ रोजी ६३ व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने सातारा येथे रयत शिक्षण संस्थेच्या आवारातील त्यांच्या स्मृतीस्थळावर राज्यातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शवून अभिवादन केले.



राज्यातील थोर समाजसुधारकांपैकी एक महत्त्वाचे नाव म्हणजे अर्थातच एक स्वावलंबी व्यक्तिमत्त्व असलेले कर्मवीर भाऊराव पाटील.जनतेला त्यांनी जी–वनात आपले जीवन जगताना प्रत्येकाने स्वावलंबी बना आणि स्वावलंबनाने कष्ट करून शिका' हा त्यांचा मंत्र होता. सर्वसामान्य जनतेपर्यंत शिक्षणप्रसार करण्यासाठी त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. भाऊरावांनी मागास आणि गरीब मुलांना शिक्षण घेणे शक्य व्हावे म्हणून 'कमवा आणि शिका' ही योजना सुरू करून मोठे काम केले. ते महात्मा जोतीराव फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक समाजाचे एक महत्त्वाचे सदस्य होते. भाऊराव पाटील यांना १९५९ साली त्यांच्या कार्याबद्दल 'पद्मभूषण' हा पुरस्कारही मिळाला. आज त्यांच्या सातारा येथील समाधीस्थळाचे दर्शन घेण्यासाठी राज्यातील प्रमुख राजकीय पक्षांची मंडळी उपस्थित होती यामध्ये रायगड जिल्हा काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष महेंद्र शेठ घरत यांनीही सातारा येथे जाऊन रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मश्री डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आज दि ९ रोजी ६३ व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने उपस्थिती दर्शवून समाधीस्थळावर नतमस्तक होऊन अभिवादन केले.

## बंद असलेल्या सोनबा येलवे पाणपोईची प्रितम म्हात्रे यांनी केली पाहणी, सुरू करण्याची केली मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या काही दिवसापासून पनवेल एसटी डेपो समोरील पनवेल महानगरपालिकेची सोनबा येलवे पाणपोई बंद आहे. त्यामुळे या ठिकाणी नागरिकांना सद्याच्या वाढत्या तापमानामुळे नाईलाजास्तव पाणी विकत घेऊन प्यावे लागत आहे. या ठिकाणी संबंधित विभागातील अधिकारी अविनाश पाटील यांना बोलावून विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी पाणपोईची पाहणी केली.

यावेली प्रितम म्हात्रे यानी पाणपोईचे तुटलेले नळ त्वरित बदलण्यास सांगितले, पाणी साठवण करण्यासाठी स्टोरेज टँक नसल्यामुळे नळाला सतत पाणी येत नसल्याने ताबडतोब स्टोरेज टाकी बसविण्याच्या सूचना केल्या. तसेच या ठिकाणी अस्वच्छता ही दिसत आहे ती त्वरित स्वच्छ करण्यास सांगितली. सदर पाणपोई स्वच्छ करून तेथील ड्रेनेजचे पाणी निचरा होण्यासाठीची पाईपलाईन सुद्धा बदलण्यासाठी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी सांगितले.

अचानकपणे पनवेल एसटी स्टँड समोरिल पाणपोईला विजिट देऊन पाणपोईची समस्या प्रितम म्हात्रे यांनी निकाली काढली आहे. पुढील दोन–तीन दिवसातच पाणपोई सुरळीत सुरु होईल,जर पालिकेने केले नाही तर स्वखर्चाने आम्ही आमच्या जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून नागरिकांची समस्या निवारण करू असे प्रितम दादांनी सांगितले आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबियांचा रयत शिक्षण संस्थेच्यावतीने हृद्य सत्कार

रयत शिक्षण संस्थेला जेव्हा जेव्हा मदतीची गरज असते तेव्हा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर नेहमी हाकेला साद देऊन संस्थेच्या विकासासाठी सातत्याने भरीव योगदान देत असतात. कर्तृत्व, दातृत्व आणि राजकारणापेक्षा समाजकारणाला महत्व देत सामाजिक जाणीव व बांधिलकी जोपासणारे रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबियांचा रयत शिक्षण संस्थेच्यावतीने संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते कर्मवीर भूमीत समारंभपुर्वक हृद्य सत्कार करण्यात आला. रयत शिक्षण संस्था मातृसंस्था माणून सदैव रयतेच्या विकासासाठी कार्य करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेला यावर्षी ०१ कोटी ९५ लाख रुपयांची देणगी, शकुंतला रामशेठ ठाकूर यांनी ०१ कोटी ३० लाख रुपये, तर पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी ५९ लाख ९० हजार रुपयांची भरघोस देणगी रयत शिक्षण संस्थेला दिली. त्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ, पुस्तक, श्रीफळ, रयत वस्त्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शकुंतला ठाकूर यांचा सन्मान आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्विकारला.

यावेळी पुढे बोलताना खासदार शरद पवार यांनी सांगितले की, कर्मवीर अण्णांनी शिक्षणाचे काम हाती घेतले आणि आपले सर्वस्व त्यांनी झोकून दिले. अण्णांनी लावलेल्या रोपट्याचे वटवृक्षात झाले आणि त्याला खत देण्याचे काम समाजातून झाले असून अण्णांचे स्वप्न असलेले रयत शिक्षण शिक्षण संस्थेचे विद्यापीठ लवकर साकारणार आहे, असेही खासदार शरद पवार यांनी यावेळी नमूद केले.

## पनवेलमध्ये व्यवसाय आणि अर्थसहाय्य मार्गदर्शन शिबिराचा शुभारंभ

उपस्थित लोकांना वास्तविक माहिती ऐकायला मिळाली. कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षस्थानी पनवेल महानगरपालिका चे विरोधी पक्षनेते प्रितम जे. म्हात्रे उपस्थित होते तसेच प्रमुख पाहुणे म्हणून जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या संचालिका सौ.ममता प्रितम म्हात्रे, नगरसेविका डॉ.सुरेखा मोहोकर, नगरसेविका सौ प्रीती जॉर्ज, ज्येष्ठ नगरसेवक शंकर शेठ म्हात्रे, युवा नगरसेवक रवींद्र दादा भगत, लक्ष्यपूर्ती वेलफेअर फेडरेशनच्या अध्यक्ष सौ मंजुषा परब, हरेश मोकल व पत्रकार वर्गाच्या उपस्थिती अनेक लाभार्थ्यांनी हजेरी लावली.

आपल्या पनवेल आणि उरण परिसरामध्ये नवीन प्रकल्प येत आहेत परंतु त्यावेळी आपल्या परिसरातील तरुणांना स्किल डेव्हलपमेंट चे प्रशिक्षण नसल्यामुळे त्याठिकाणी नोकरभरतीमध्ये त्यांना प्राधान्य दिले जात नाही यासाठी आमचे नेते आणि जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष प्रितम म्हात्रे यांच्या संकल्पनेतून आम्ही आज हे शिबीर राबविले. ज्यामध्ये भविष्यात येणाऱ्या प्रकल्पामध्ये स्थानिक तरुणांना आवश्यक ते कोर्सेस केल्यामुळे प्राधान्य दिले जाईल. यापुढेही प्रितमदादांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही पनवेल–उरण–खालापूर तालुक्यामध्ये अनेक शिबिर आयोजित करणार आहोत अशी माहिती शेकाप युवानेते मंगेश अपराज यांनी दिली.

## तळा सोनार आळीतील मोरीची अवस्था पुन्हा जैसे थे ; प्रशासनाचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा शहरातील सोनार आळी येथील रस्त्यावर पुन्हा खड्डा पडला असून येरे माझ्या मागल्या'अशी परिस्थिती झाल्याचे चित्र पहायला मिळत आहे. याकडे नगरपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. शहरातील सोनार आळीतील येथील मोरीवर मोठा खड्डा पडला होता. व हा खड्डा दगड टाकून भरण्यात आला होता. याच रस्त्यावरून पुढे महाविद्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच वाड्या वस्त्या असल्याने दिवसभर या रस्त्यावरून नागरिकांची रहदारी सुरू असते. भारत गँस ऑफीसला सिलेंडरच्या गाड्या नियमितपणे येत जात असते या खड्यांमुळे दिवसा तसेच रात्रीच्या वेळीअपघात घडण्याची देखील शक्यता होती.याबाबत वृत्तपत्र व प्रसार माध्यमांमधून ही बातमी झळकतात हा खड्डा त्वरित बुजविण्यात आला.त्यामुळे नागरिकांमधून समाधान देखील व्यक्त करण्यात आले होते. मात्र हा खड्डा बुजविण्याचे काम इतके निकृष्ठ दर्जाचे होते की अवघ्या महिना भराच्या आतच या खड्डयाची दुरवस्था झाली ती तागायत

असून या खड्डयाची पुन्हा जैसे थै परिस्थिती झाली आहे.या मुख्य रस्त्यावरून अनेक वेळा नगरसेवक नगरसेविका, नगराध्यक्षा जात असून या खड्डयाकडे लक्ष नाही. ही मोरी अर्धे अधिक दगड माती ग्रीटने भरली असून मागील वर्षाप्रमाणे यावर्षी पणपावसाळी पाणी अडण्याची शक्यता आहे ठेकेदार आपल्या आर्थिक स्वार्थासाठी कसे निकृष्ठ दर्जाची कामे करतात हे यातून स्पष्ट होते. नगरपंचायत प्रशासनाचा ठेकेदारावर वचक राही–लेला नाही ठेकेदारच्या बेजबाबदार वागणुकीमुळे या ठिकाणी अपघात घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मोठ्या अनर्थ घडल्यास जबाबदार कोण? असा सवाल पादचारी, नागरिक करीत आहेत. त्यामुळे नगरपंचायतीने तात्काळ या खड्डयाची डागडुजी करून अशा निकृष्ठ दर्जाची कामे करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## बाळकृष्ण गोविंद मुळे यांच्या निवासस्थानी खा.सुनील तटकरे यांनी घेतली कुटुंबियांची भेट

**दै.रायगड नगरी । तळा**

बाळकृष्ण गोविंद मुळे यांचे दि.२४.४.२२ रोजी दुःखद निधन झाले माजी मंत्री आणि खासदार सुनील तटकरे आणि बाळकृष्ण मुळे यांची जुनी मैत्री होती तटकरे यांच्या मर्जीतील दादा एक होते.दादांच्या निधनाने त्यांनाही धक्का बसला.

तटकरे यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन बंधू पुरुषोत्तम मुळे, अजित मुळे, मुलगा मितेश मुळे मुलगी सून यांचे सांत्वन केले. यावेळी दादांच्या प्रतीमेपुढे पुष्पांजली अर्पण करत त्यांनी श्रद्धांजली वाहिली यावेळी तटकरे यांच्या समवेत चंद्रकांत रोडे, नाना भौड, महेंद्र कजबजे, ॲड.उत्तम जाधव, कैलास पायगुडे, पत्रकार संजय रिकामे आदी उपस्थित होते.

## भारतीय मजदूर संघ रायगड जिल्ह्याच्या वतीने महागाई विरोधात निदर्शने

**दै.रायगड नगरी । उरण**

भारतीय मजदूर संघ रायगड जिल्ह्याच्या वतीने उरण तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी भाऊसाहेब अंधारे यांना देशात वाढणाऱ्या महागाईच्या भस्मासुरा विरोधात सोमवारी निवेदन देण्यात आले.

देशात पेट्रोल डिझेलचे भाव बघता महागाईने आसमान कवेत घेतले आहे. तसेच किरकोळ बाजारात व किराणा दुकानात किमती या साधारण दुपटीने वाढल्या आहेत. याचा परिणाम माणसांच्या कामगारांच्या गरिबांच्या खिशावर मोठ्या प्रमाणात होत आहे. सदरची बाब गंभीर असून, या राज्यांमध्ये या देशांमध्ये विरोधी पक्ष हा कमजोर असल्याने या सरकारला जाब विचारणारे कोणी नाही.

त्यासाठीच भारतीय मजदूर संघ रस्त्यावरती उतरला आहे प्रचंड वाढलेली महागाई कमी करण्यासाठी आगामी काळात राज्य सरकारने सर्व कर कमी करून गोरगरीब कष्टकरी जनतेला दिलासा द्यावा.

यासाठी उरण तहसीलदार यांच्यामार्फत एक पत्र महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या नावाने आज कार्यकर्त्यांनी आक्रोश स्वरूपात दिलेले आहे. यावेळी रायगड जिल्ह्याचे भारतीय मजदूर संघाचे अध्यक्ष सुरेश पाटील तसेच उपाध्यक्ष मधुकर पाटील, ॲड. विशाल मोहिते सचिव महाराष्ट्र प्रदेश, धर्माजी पाटील मंगेश पवार सह कार्यकर्ते उपस्थित होते.

# लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी उरणचा पदग्रहण सोहळा थाटामाटात संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण येथील भोईर गार्डन येथे लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी उरण चा पदग्रहण सोहळा मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डिस्ट्रिक गव्हर्नर पि. एम.जे. एफ लायन तावरी, डिस्ट्रिक गव्हर्नर अमरचंद शर्मा, रिजनल चेअर पर्सन लायन ज्योती देशमाने, इ .एक्स.टी चेअर पर्सन गौरी देशपांडे, लायन्स क्लब उलवे जेम्सचे अध्यक्ष मिलिंद पाटील आणि सभासद, लायन्स क्लब द्रोणागिरी चे सर्व लिओ सभासद, लायनस क्लब ऑफ द्रोणागिरी चे पदाधिकारी व सर्व सभासद उपस्थित होते.



ढोल ताशाच्या गजरात प्रमुख पाहुण्यांचे स्वागत झाले. त्यानंतर गौरी देशपांडे यांनी उरणला लाभलेले नैसर्गिक सौंदर्य, भौगोलिक वातावरण, व उरण शहराचे औद्योगिक महत्व सूत्रसंचालन करताना सांगितले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गणेश पुजन व दिपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर उलवे लायन्स क्लब च्या भगिनींनी आपल्या सुरेल गळ्यातून ईशस्तवन व स्वागत गीत गाऊन तेथील वातावरण मंगलमय केले. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत झाले. डिस्ट्रिक गव्हर्नर तावरी यांनी आपल्या भाषणात सांगितले की माझ्या साठी हा एक अविस्मरणीय क्षण ,ऐतिहासिक क्षण आहे की आज या सुंदर क्षणाचा मी सोबती आहे ते क्षण म्हणजे द्रोणागिरी लायन्स क्लबचा आज पदग्रहण सोहळा होत आहे. यावेळी नवनिर्वाचित लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी उरण च्या लायन्सचा पदभार घेण्यापूर्वी शपथविधी झाला व त्यानंतर प्रत्येक लायन्स सभासदांस ती ती जबाबदारी व पदभार सोपविण्यात आला.

गौरी देशपांडे व राखी लोणकर यांच्या यांनी उत्तम सुत्रसंचलन केले.लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी उरणचे महत्वाचे आणि जबाबदारी चे पद म्हणजे अध्यक्षपद लायन संदीप म्हात्रे यांना देण्यात आले. त्यांनीही हे पद सन्मानाने स्विकारून नवीन पदाच्या जबाबदारी चे काम निष्ठेने आणि विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यासाठी कटीबद्ध रहाण्यासाठीचा विश्वास दर्शविला.

लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी चे लायन अध्यक्ष संदीप म्हात्रे, सेक्रेटरी लायन मोनिका चौकर, खजिनदार लायन सुषमा काळे, लायन सागर चौकर, लायन प्रज्ञान म्हात्रे, लायन भुमीका सिंग,लायन स्नेहा नवाळे, लायन अश्विनी धोत्रे, लायन संदीप देशपांडे, लायंन कांचन आसरकर, लायन भारती दत्त,लायन दिपाली गुरव, लायन तनुजा भोईर,लायन राकेश, चोणकर ,लायन शैलेश डावरे लायन अश्विनी धोत्रे, लायन वेंडी मिरंडा, लायन रंजना म्हात्रे आदी लायन टिमने मिळालेल्या पदाचा स्विकार करून पुढील जबाबदारी घेण्यासाठीची तयारी दर्शवली. त्याचप्रमाणे जवळजवळ १५/२० अल्पवयीन मुले व मुलांनी या संस्थेच्या कार्यप्रणालीस प्रेरीत होवुन आतापासूनच समाजसेवेचे व्रत जोपासण्यासाठी तयारी दर्शवली. लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी तर्फे घेण्यात आलेले उपक्रम म्हणजे नाईक नगर येथे पाण्याची बोअरवेल, झोपडपट्टीतील मुलांना शालेय साहित्य वाटप, नाईक नगर झोपडपट्टीतील बालवाडीत फर्स्ट एड बॉक्स, अमोल दुरूगकर यांच्या सरबत स्टॉल साठी लायन्स क्लब ची मोठी छत्री त्यावेळी देण्यात आली.

लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी तर्फे सध्या चालू असलेले उपक्रम म्हणजे नाईक नगर झोपडपट्टीमध्ये दर शनिवारी दिडशे मुलांना मोफत जेवण वाटप, तेथीलच ५० मुलांना, शनिवार रविवार मोफत शिक्षण दिले जाते . त्याचप्रमाणे श्री. समर्थ मठ केगाव येथे दर गुरुवारी खिचडी वाटप करण्यात येते तसेच गोरक्षनाथ मंदिर वहाळ येथे लायन्स क्लब ऑफ उलवे जेम्स आणि इतर क्लबच्या वतीने एकावेळी आठशे लोकांना जेवण दिले जाते. नवनिर्वाचित लायन अध्यक्ष संदीप म्हात्रे यांनी भविष्यात लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी उरण च्या वतीने मोतिबिंदू कॅम्प व आता पावसाळा सुरु झाल्यावर उरण ते नवीमुंबई परिसरात वृक्षारोपणाची मोहीम हाती घेण्याचे सांगितले आहे. लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी उरण च्या लायन मोनिका चौकर यांनी आलेल्या पाहुण्यांचे व जमलेल्या मान्यवरांचे आभार मानले.

# वाढत्या उष्म्याने बाजारात शुकशुकाट

## फिरते व रस्त्याच्या कडेला बसणाऱ्या विक्रेत्यांना फटका

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

जिल्ह्यात तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्या वर जात आहे. परिणामी उष्मा प्रचंड वाढल्याने सर्वच बाजारपेठांमध्ये दुपारी बारा वाजल्यापासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत शुकशुकाट पहायला मिळत आहे. फिरते व रस्त्याच्या कडेला बसणाऱ्या विक्रेत्यांना उन्हाचा सर्वाधिक फटका बसत आहे.




पावसाळा काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे या दिवसांत कडधान्य, सुकी मासळी आदी अगोटीच्या खरेदीची लगबग पाहायला मिळते. शिवाय शेतकरी बी-बियाणे, खते आदींच्या खरेदीला लागतात. ताडपत्री व इतर सामानाची देखील खरेदी केली जाते. मात्र सध्या प्रचंड उष्मा असल्याने या खरेदीसाठी कोणी बाहेर पडतांना दिसत नाही. याचा येथील व्यवसायांवर प्रतिकूल परिणाम होत आहे. मालाला उठाव नाही. त्यामुळे अनेकांचे नुकसान होत आहे. असे पाली व्यापारी असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रशांत खैरे यांनी सांगितले.

अनेक आदिवासी महिला गावठी भाज्या, कैऱ्या, आंबे, काजूगर, कोकम, जाम, करवंद आदी रानमेवा विक्रीसाठी रस्त्याच्या कडेला बसतात. मात्र येथे कित्येक तास त्यांना उन्हात बसावे लागते. लांब गावावरून येत असल्याने शहरात किंवा बाजर ठिकाणी त्यांना कोणतीच सोय नसते. अशा वेळी ही गैरसोय व उन्हाचा त्रास यामुळे त्यांचे खूप हाल होतात. शिवाय वाढत्या उन्हामुळे ग्राहक बाहेर पडत नसल्याने मालाची विक्री देखील होत नाही. असे लक्ष्मी पवार या आंबा व रानमेवा विक्रेत्या महिलेने सांगितले.

## जेएनपीटी रोडवर अपघातात मृत पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना आर्थिक मदत सुपूर्द

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी रोडवर झालेल्या अपघातात नंदु राजाराम पाटील, रा.रावे-पेण यांचे निधन झाले होते, घरातील कर्ता-कमवताच मयत झाल्याने पाटील कुटुंबीयांवर आर्थिक संकट कोसळले होते.

उरणचे माजी आ.मनोहर भोईर यांनी गंभीर अशा दुर्घटनेची दखल घेत सदर ट्रेलर मालक व रावे येथील मृताच्या पाटील कुटुंबातील सदस्यांसमवेत चर्चा करून पाटील कुटुंबीयांना योग्य तो न्याय मिळवून देण्याचे आश्ववासीत केले होते. काल दि. ०९ मे २०२२ रोजी मा.आ मनोहर भोईर यांच्यात महत्वपुर्ण चर्चेला यश प्राप्त होत मृताच्या पत्नी श्रीमती प्राची नंदु पाटील यांना सदर ट्रेलर मालक यांच्या वतीने २ लाख ५० हजार रुपयांचा आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी कोप्रोली ग्रा.पं.सदस्य विकास म्हात्रे उपस्थित होते.



# प्रभादेवीमध्ये १९६ निरंकारी भक्तांचे उत्साहपूर्ण रक्तदान ; संत निरंकारी मिशनचे आयोजन

**दै.रायगड नगरी । मुंबई**

'रक्त नाड्यांमध्ये वाहावे, नाल्यांमध्ये नको' या निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराज यांच्या उद्घोषातून प्रेरणा घेत प्रभादेवी म्युनिसिपल स्कूल, मुरारी घाग मार्ग, प्रभादेवी, मुंबई येथे संत निरंकारी मिशनच्या विद्यमाने रविवार, दि.८ मे, २०२२ रोजी आयोजित रक्तदान शिबिरामध्ये १९६ निरंकारी भक्तांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान केले. मिशनच्या वरळी शाखने आयोजित केलेल्या या शिबिरामध्ये वरळी, प्रभादेवी व आजुबाजुच्या परिसरातील निरंकारी भक्तांनी भाग घेतला. संत निरंकारी रक्तपेढी, विलेपार्ले, मुंबई यांनी रक्त संकलित केले.



रक्तदान शिबिराचे उद्घाटन मंडळाच्या दादर विभागाच्या सेक्टर संयोजक श्रीमती पूजा चुघ यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या शिबिराला सदिच्छा भेट देणाऱ्यांमध्ये विधान परिषद सदस्य सुनिल शिंदे, विधानसभा सदस्य सदा सरवणकर, माजी नगरसेवक तथा बेस्ट समितीचे अध्यक्ष आशिष चेंबूरकर, माजी प्रभाग समिती अध्यक्ष एफ नॉर्थ व एफ साऊथ रामदास कांबळे, माजी नगरसेविका श्रीमती हेमांगी वरळीकर आदि मान्यवर उपास्थित होते. सर्व मान्यवरांनी संत निरंकारी मिशनच्या मानवतेच्या प्रति निष्काम सेवांची प्रशंसा केली.

प्रभादेवी येथील रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यामध्ये मंडळाचे स्थानिक सेक्टर संयोजक गोपिनाथ बामुगडे, सेवादलाचे क्षेत्रीय संचालक शंकर सोनावणे, स्थानिक मुखी, सेवादल अधिकारी आणि संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचे स्वयंसेवक यांनी महत्वपूर्ण योगदान दिले.

उल्लेखनीय आहे, की संत निरंकारी मिशनच्या वर्तमान सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज निरंकारी भक्तांना सदोदित समर्पित भावनेने मानवतेची सेवा करण्याची प्रेरणा देत असतात. त्यांचे पावन आशीर्वाद व दिव्य शिकवण यातूनच मिशनचे सेवादार भक्त रक्तदान, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, नैसर्गिक आपत्तीत मदत कार्य अशा विविध समाज कल्याण उपक्रमांमध्ये आपले योगदान देत असतात.

## हिंदू लिंगायत समाजाला ओबीसीचे दाखले देण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

हिंदु लिंगायत समाजाला ओबीसीचे दाखले द्यावे अशी मागणी जागतिक लिंगायत महासभेने मुंबई येथे झालेल्या बैठकीत ना.विजय वडेट्टीवार यांच्याकडे केली आहे.त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगा कडे सुचना केल्या आहेत.

लिंगायत समाजातील ओबीसी प्रवर्गातील समाजाला ओबीसी दाखले मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याने हिंदु लिंगायत असलेल्यांना ओबीसी चे दाखले देण्यात यावे अशी मागणी जागतीक लिंगायत सभेचे नेते प्रदिप बापू वाले, समन्वयक राजशेखर तंबाके, शिवानंद कथले, प्रविण बिराजदार यांनी ना.विजय वडेट्टीवार यांच्या समवेत मुंबई येथे झालेल्या बैठकीत केले आहे. या संबधीत ना.विजय वडेट्टीवार यांना निवेदन दिले आहे.

ना.विजय वडेट्टीवार यांनी लिंगायत समाजाच्या मागणीचा सकारात्मक प्रतिसाद देत महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडे सुचना केल्या आहेत.

या मागणीचा विचार केल्यास हिंदू लिंगायत समाज च्या लागल्याचा प्रश्न मार्गी लागल्यास त्याचा लाभ लिंगायत समाजाला होणार आहे.

## रिक्षाच्या धडकेत दोघे जखमी, रिक्षा चालकावर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील दत्त इन हॉटेल समोर रस्त्याने चालत जात असताना रिक्षाने दिलेल्या धडकेत दोघे जण जखमी झाले आहेत. रिक्षा क्रमांक एम एच ४६ बीपी १६१० वरील चालक गणेश तुकाराम राठोड (रा. वावेघर) याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दहिसर मोरी येथील मोहम्मद मुकीन मोहम्मद रशिद हा त्याचा नातेवाईक सगीर अहमद हे दोघे दहिसर मोरी येथून पनवेल बस स्थानकावर उतरले. रोह्याला जाण्यासाठी ते दत्त इन हॉटेल समोरून रस्त्याने पायी चालत जात असताना एम एच ४६ बीपी १६१० वरील चालक गणेश राठोड याने त्यांना धडक दिली. या धडकेत रशीद याच्या डोक्याला व हाताला दुखापत झाली. तर सगीर याच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे.


ॲड.राकेश दिघे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात

क्रि.चौ.अर्ज क्र.५४३/२०२२

श्री.शंभो किसन दिघे
वय : ४७ वर्षे, व्यवसाय : व्यापार
पत्ता : मु.पो.सोमटणे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रुप ग्रामपंचायत सोमटणे — सामनेवाला

तमाम लोकांस नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार यांची आई सत्यभामा किसन दिघे ह्यांचा मृत्यू दि.५/०२/१९८१ रोजी रा.सोमटणे, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. अर्जदार यांची आई सत्यभामा किसन दिघे यांच्या मृत्यूची नोंद होण्यासंबंधी ग्रुप ग्रामपंचायत यांस योग्य ते आदेश पारित करण्याकरिता अर्जदार सदरचे अर्ज मे.कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे मृत्यूचा दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास त्यांचे विनंतीप्रमाणे मृत्यूचा दाखला दिला जाईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०९/०५/२०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने सूचना देण्यात येते की, माझे अशिल श्री. भाग्येश जयंत चौधरी व श्री. जयंत लक्ष्मण चौधरी रा. फ्लॅट क्रं. १३, यशराज अपार्टमेंट, मुंबई-आग्रा हायवे, दीपाली नगर, नाशिक, ४२२००९ यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत श्री. विपिन सुरेंद्रन कुनिमल व सौ. नमिता विपिन कुनिमल मिळकतीचे मालक यांचे कडून कायम खरेदी घेणेबाबत व्यवहार केलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे मालकांनी दिल्यावरून माझ्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**रहिवासी सदनिका क्रमांक ७०१, क्षेत्र ५७१ चौ. फूट कारपेट + ४९ चौ. फूट एफ. बी. + ८९ चौ. फूट टेरेस, ७ वा मजला, सी स्टार, प्लॉट नं. ७७, सेक्टर-०५, उलवे, ता पनवेल, जि रायगड, नवी मुंबई ४१०२०६**

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसबंध, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, वैगरेबाबत कसलाही हक्क हितसबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत सादर करावी. अशाप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कापासून आणि अधिकारापासून किंवा अन्य प्रकारच्या बंधनातून मुक्त असेल असे समजण्यात येईल व ही मिळकत निर्वेध व बोजेवीरहित आहे असे समजून माझे अशील सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक: ०८ मे २०२२
स्थळ: नवी मुंबई

सही/-
ॲड. पवन र. पाटील,
५, एस. एम. चंद्रभागा, प्लॉट नं. १००, सेक्टर २१, उलवे, ता. पनवेल
जि. रायगड नवी मुंबई ४१०२०६



मा.गोडसे सो। कोर्ट

ॲड.रेखा होवाळे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे समोर

चौ.अर्ज क्र.५६९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१८/६/२०२२

स्टीफन झॅक पंतगनी
वय : ५३ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.फ्लॅट नं.७०३, अरिहंत अमोडीनी सी.एच.एस.
प्लॉट नं.४, सेक्टर २४, तळोजा-४१०२०८ — अर्जदार

ज्यापेक्षा मयत श्री.अब्दुल खादर अब्दुल रझाक उर्फ (ऐ.के.ऐ.रझाक) यांचा मृत्यू दि.११/०३/२००१ रोजी एम.जी.एम.रुग्णालय कामोठे येथे निधन झाले आहे. अर्जदार हा त्यांचा मुलगा आहे आणि अर्जदार यांनी खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

**SCHEDULE OF PROPERTY 'A'**
**Name of the Property Holder : Late Abdul Khader Abdul Razak alias (A.K.A. Razak)**
**Flat No.C/102, First Floor, Olive Mount C.H.S. Ltd, at Village Palaspe, Plot of land bearing Survey No.39, Hissa No.4, Taluka-Panvel, District-Raigad.**
**Admeasuring area 550 Sq. Ft. (Built-up)**
**Agreement Value Rs.2,50,000/-**
**(Rupees Two Lakhs Fifty Thousand Only)**

यासाठी सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखी नोटीस वरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत यांचा वारस घोषित करेल.

तारीख ९ माहे मे सन २०२२ बेलिफाकडे

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे माझे पक्षकाराचे वतीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, घरमालक श्री.दिपक दशरथ घरत यांचे ताबा कब्जात व वहिवाटीत ग्रुप ग्रामपंचायत : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची घर मिळकत आहे. त्या घर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**ग्रुप ग्रामपंचायत : ओवळे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| घरमालकाचे नाव | व्हीओ नं. | अनुज्ञेय क्षेत्र चौ.मी. | बांधकामाचा वापर |
|---|---|---|---|
| श्री.दिपक दशरथ घरत | व्ही.ओ.नं.१५४ | १२१.२८ | निवासी |

सदर वरील घर मिळकत सिडकोने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकरिता शासनाद्वारे संपादीत केलेली असून, त्या संपादीत मिळकतीच्या मोबदल्यात शासनाच्या साडेबावीस टक्के योजनेंतर्गत विकसित भूखंड श्री.दिपक दशरथ घरत यांना देण्याचे जाहीर झालेले आहे. त्या भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मिळकतीचे वर्णन**

**नोड : पुष्पक/वडघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| युनिट के. क्र. | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| व्हीओव्ही-आयसीआयजी-७२ | १ | ४८ | ३७० चौ.मी. क्षेत्रापैकी १८५ चौ.मी. क्षेत्र (अविभाज्य हिस्सा) चे बक्षिसपत्र |

सदर आमचे पक्षकार श्री.दिपक दशरथ घरत यांनी वर वर्णनाची मिळकत / भूखंड आमचे पक्षकाराचा भाऊ श्री.चिंतामण दशरथ घरत यांना वरील ३७० चौ.मी. क्षेत्रापैकी १८५ चौ.मी. क्षेत्र (अविभाज्य हिस्सा) चे बक्षिस पत्राद्वारे द्यावयाचे ठरविलेले आहे. तरी सदरहू मिळकतीवर / भूखंडावर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री, पुराव्यासह खालील सही करणार वकीलांच्या पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रर, दावा न आल्यास सदर भूखंड निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार मिळकतीचे / भूखंडाचे बक्षिसपत्राचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०९/०५/२०२२

सही/-
ॲड.कैलास नारायण घरत
००२, प्राईड सी.एच.एस.लि., सेक्टर-११, भूखंड क्र.०५, माथेरान रोड, नवीन पनवेल, जि.रायगड-४१०२०६
मो.नं.९५९४६५३७७७

# मान्सूनपूर्व कामे गतीने करा; आपत्तीग्रस्तांना तत्काळ मदतीसाठी तत्पर रहावे : विजय वडेट्टीवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

सर्व प्रशासकीय यंत्रणांनी मान्सूनपूर्व कामे गतीने करावीत. त्याचबरोबर अचानक येणारी वादळे व पूर यामुळे होणारी जीवित व वित्त–हानी टाळण्यासाठी, या आपत्तीमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांना तत्काळ मदत व पुनर्वसन करण्यासाठी राज्यात आपत्ती प्रतिसाद यंत्रणेची अंमलबजावणी करण्यात येणार असून याचे सर्व जिल्हास्तरीय यंत्रणांना प्रशिक्षण द्यावे, असे निर्देश आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिले.



आज कोकण व पुणे महसूली विभागातील जिल्ह्यांची मान्सूनपूर्व आढावा बैठक दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून झाली. यावेळी मंत्रालय दालनातून आपत्ती व्यवस्थापन,मदत व पुनर्वसन मंत्री श्री. वडेट्टीवार बोलत होते. या बैठकीला मदत व पुनर्वसनचे प्रधान सचिव असिमकुमार गुप्ता, आपत्ती व्यवस्थापन संचालक संजय धारूरकर यांच्यासह दूरदृश्यप्रणालीव्दारे कोकण विभागीय उपायुक्त मकरंद देशपांडे, मुंबई शहरचे जिल्हाधिकारी राजीव निवतकर, मुंबई उपनगरच्या जिल्हाधिकारी निधी चौधरी, सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकारी के. मंजूलक्ष्मी, ठाण्याचे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, रत्नागिरीचे जिल्हाधिकारी पी.बी.पाटील, पुणे विभागीय आयुक्त सौरभ राव, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी राहुल रेखावार, सोलापूरचे जिल्हाधिकारी मिलींद शंभरकर, मुंबई महापालिका आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नारळीकर, पालघरचे जिल्हा पोलीस अधिक्षक दत्तात्रय शिंदे, पालघरचे निवासी उपजिल्हाधिकारी किरण महाजन, सांगलीच्या अप्पर जिल्हाधिकारी स्वाती देशमुख, सातराचे निवासी उपजिल्हाधिकारी सुनिल थोरवे, राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाचे (एनडीआरएफ) मुधोळकर तसेच दोन्ही विभागातील जिल्हा पोलीस अधिक्षक, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. वडेट्टीवार म्हणाले, आपत्ती कालावधीत शून्य मृत्यूदर हे शासनाचे ध्येय असून, आपत्ती प्रतिसाद यंत्रणा राज्यात लागू करण्यात येत आहे. आपत्तीत प्रभावी प्रतिसाद देण्यासाठी सर्व यंत्रणामध्ये योग्य तो समन्वय राहावा, यासाठी ही यंत्रणा काम करणार आहे. त्यामुळे या यंत्रणेसाठी लागणारे प्रशिक्षण व इतर माहिती जिल्हांना तत्काळ पुरवावी, अशा सूचना यावेळी श्री. वडेट्टीवार यांनी बैठकीत दिल्या.

मंत्री श्री. वडेट्टीवार म्हणाले की, गेल्या तीन वर्षात मोठ्या प्रमाणात पावसामुळे आपत्तीला तोंड देत आहोत. यंदाच्या वर्षीही सरासरीपेक्षा जास्त व वेळेपूर्वी पाऊस येणार असल्याचा अंदाज आहे. हा अंदाज पाहून त्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यात आपत्ती निवारणाची कामे करण्यात यावीत. अचानक येणारे पूर, दरडी कोसळणे आदी आपत्तीला तोंड देण्यासाठी स्थानिक ठिकाणची प्रशासकीय यंत्रणा गतीमान असली पाहिजे, यासाठी शासन प्रयत्नशील आहे. पूर व अतिवृष्टीमुळे पाणी साठू नये यासाठी ज्या क्षेत्रात नागरीकरण मोठ्या प्रमाणात आहे, तेथे पावसाळ्यापूर्वीची नाले सफाईची, धोकादायक वृक्ष तोडणे अथवा फांद्या तोडणे, रस्ते दुरुस्ती, बांधकामाची कामे पूर्ण करावीत. यंदाही पाऊस लवकर सुरू होणार आहे, हे लक्षात घेता सर्व यंत्रणांनी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे आपली आपत्ती यंत्रणा बळकट करावी. विशेषत: मुंबई प्रशासनाचा रेल्वे प्रशासनाशी समन्वय असणे अत्यंत आवश्यक आहे.

कोकण विभागात पावसाळ्यात अनेकदा आ–पत्ती ओढावते. अशा वेळी स्थानिक ग्रामस्थांची मदत घेऊन तत्काळ मदत पोचविण्यासाठी पथके तयार करण्यात यावीत. या पथकांना लागणारे आवश्यक ते साहित्य पुरविण्यात येईल. तसेच प्रत्येक जिल्हा पातळीवर तरुणांचे पथक तयार करून त्यांना आपत्ती काळातील मदतीसंदर्भातील प्रशिक्षण देण्यात यावे. रायगड येथे राज्य आपत्ती निवारण पथकाचे दल तैनात ठेवण्यात येणार आहे. राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाचे पथकही येथे तैनात करण्यासंदर्भात प्रयत्न सुरू आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

प्रत्येक गावाचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा करण्याच्या व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीत आवश्यक साहित्यांची मागणी करण्याच्या सूचना विभागाचे प्रधान सचिव श्री. गुप्ता यांनी दिल्या. यावेळी दोन्ही विभागातील जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी संभाव्य आपत्ती निवारणासाठी तसेच पावसाळ्यात करावयाच्या उपाययोजनासंदर्भात माहिती दिली.

# संक्षिप्त...

## तरुणांची आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात कारणावरून एका तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना पनवेल जवळील कोळखे गावाच्या हद्दीत घडली आहे.

या ठिकाणी राहणाऱ्या सनी मुंडे ( वय २३ ) यांने राहत्या घरात सीलिंग पंख्याला साडीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली असुन, याची नोंद पनवेल शहर पोलिश ठाण्यात करण्यात आली आहे.

## धार्मिक स्थळांच्या सुरक्षिततेबाबत उरण पोलीस ठाणे तर्फे महत्वाची बैठक संपन्न



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण पोलीस ठाणे हद्दीतील धार्मिक स्थळ– मंदिर, मस्जिद, दर्गे, चर्च, बुध्दविहार यांची विश्वस्त,पदधिकारी, मालक, देखरेख करणारे पुजारी यांची कोकण ज्ञानपिठ महाविद्यालय, उरण येथील कक्षात बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीमध्ये उपस्थितांना देव–देवतांचे दागिने सुरक्षित ठेवणे, यात्रा उत्सव विहीत वेळीत आयोजित करणे, ध्वनिक्षेपकाची परवागनी घेणे, मंदिरा सभोवताली पुरेसा प्रकाश व्यवस्था करणे, सीसीटीव्ही कॅमेरे लावणे, मंदिराचे दरवाजे लावणे, मंदिराचे सुरक्षितेच्या दृष्टीने सुरक्षा रक्षक नेमणे इत्यादी बाबत मार्गदर्शन करून सुचना देण्यात आल्या आहेत.यावेळी उपस्थितांना उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश माने, पोलीस नाईक भीमराज शिंदे यांनी मार्गदर्शन केले. सदर बैठकीकरीता उरण पोलीस ठाणे हद्दीतील धार्मिक स्थळांचे ६०/७० विश्वस्त, पदधिकारी, मालक, देखरेख करणारे पुजारी उपस्थित होते. सदरची बैठक शांततेत पार पडली आहे.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# कोरोनामध्ये विधवा झालेल्या महिलांना रोजगार आणि बेरोजगार झालेले स्थानिक पुरूष यांना कंत्राट वर नोकरी द्या

## शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे शिवसेनेनी केली मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगर पालिकेच्या क्षेत्रात येणाऱ्या कामोठे शहरातील कोरोना काळात ज्या महिला विधवा झाल्या आहेत आणि आज त्यांच्या पाठीशी कोण नाहीत , त्यांच्यावर लहान मुलांना सांभाळण्याची जवाबदारी आहे अश्या महिलांना पनवेल महानगर पालिका तर्फे रोजगार निर्माण करून द्यावेत अशी मागणी शिवसेना खासदार श्रीरंग अप्पा बारणे याच्या कडे शहरप्रमुख कामोठे शहर राकेश गोवारी यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन मनोहर त्रिमुखे(उप विभाग प्रमुख प्रभाग क्र–१३) यांनी केली आहे .



या संदर्भात शिवसेना खासदार श्रीरंग अप्पा बारणे यांची शहरप्रमुख कामोठे शहर राकेश गोवारी यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन मनोहर त्रिमुखे(उप विभाग प्रमुख प्रभाग क्र–१३),संजय जंगम उप विभाग प्रमुख कामोठे शहर यांनी भेट घेऊन त्यांनी खा. आप्पा बारणे यांना सांगितले की, कोरोना काळात ज्यांचे नोकरी गेल्या आहेत त्यांनी आपली घर विकून मुलांना आणि आपल्या आई वडिलांना सांभाळलं त्यांना अजून नोकरी अजून मिळाली नाही अश्या गरजू मुलांना पनवेल महानगर पालिका मध्ये कंत्राटी पद्दतीवर शिपाई, सफाई कामगार आणि इत्तर विभागात कामावर घ्यावे.

कोरोना काळात रहिवासाचे खूप वाईट परिस्थिती आली आहे. आता कुठे खंबीर पणे उभे राहिले आहेत. तरी लवकरात लवकर याच्या वर विचार करून मार्ग काढावा अशी मागणी केली आहे. या मागणीला पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी सुद्धा सकारत्मक प्रतिसाद दिला आहे .

# सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील तूरमाळे येथे अज्ञात इसमाने घराच्या बेडरूममध्ये कप्प्यांमध्ये ठेवलेल्या बॉक्समधील ४०६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अनोळखी आरोपी विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तूरमाळे येथील अंजली श्याम वांगीलकर यांनी सोन्याचे दागिने हे घराच्या बेडरूममधील प्लास्टर ऑफ पॅरिसने बनवलेल्या सिलिंगच्या व छताच्या मध्ये मोकळी जागा आहे त्या ठिकाणी बॉक्स मध्ये ठेवले होते. ६ मे रोजी साखरपुड्याचा कार्यक्रम करता जाण्यासाठी त्यांनी बॉक्स उघडला असता त्यात दागिने नव्हते. त्यांनी दागिन्यांचा शोध घेतला मात्र ते सापडले नाहीत. १३ एप्रिल रोजी त्यांच्या घरी एअर कंडिशनर सर्विसिंगसाठी दोघेजण आले होते. त्यानंतर १७ एप्रिल रोजी दोन्ही इसम त्यांच्या घरी येऊन एयर कंडीशननरला पार्ट बसवून निघून गेले. त्यानंतर ही त्यांची एअरकंडशनर व्यवस्थित होत नसल्याने १९ एप्रिल रोजी ते पुन्हा त्यांच्या घरी आला. एअर कंडिशनर आणि सिलिंगच्या मोकळ्या कप्यामध्ये ठेवलेल्या दागिन्यांच्या बॉक्समध्ये केवळ एक फुटाचे अंतर आहे. त्यामुळे एयर कंडीशनर सर्विसिंग करता आलेला अनोळख्या इसमानेच दागिने चोरल्याचा त्यांना संशय आहे. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम २०२२ जाहीर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्य निवडणूक आयोगाकडून राज्यातील माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२२ या कालावधीत मुदत समाप्त झालेल्या तसेच मुदत समाप्त होणाऱ्या व नवनिर्मित अशा एकूण २०८ नगरपरिषदांच्या सदस्य पदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम २०२२ जाहीर झालेला आहे.

परंतु सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२१, दि.११ मार्च २०२२ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियमामध्ये सुधारणा केल्यानंतर प्रभाग रचना राज्य निवडणूक आयुक्तांच्या मान्यतेने राज्य शासनाने करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

या सुधारणेस अनुसरून राज्य निवडणूक आयोगाने दि.२२ फेब्रुवारी २०२२ घ्या आदेशानुसार राज्यातील माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२२ या कालावधीत मुदत समाप्त झालेल्या तसेच मुदत समाप्त होणाऱ्या व नवनिर्मित अशा एकूण २०७ नगरपरिषदांच्या सदस्य पदाच्या सार्वत्रिक निवडणुकासाठी प्रभाग रचना कार्यक्रमाबाबत कार्यवाही अधिनियमातील नवीन तरतुदीनुसार राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे करण्यात यावी, असे आयोगाने सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून) यांना दि.१४ मार्च २०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दि.०४ मे २०२२ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रभाग रचनेचा सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. या कार्यक्रमानुसार नगरपरिषदांच्या निवडणुकांकरिता प्रभागांच्या सीमा दर्शविणारी प्रारूप अधिसूचना दि.१० मार्च २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून दि.१० मार्च २०२२ पासून प्रारूप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या आक्षेप व हरकतीसह सुधारीत कार्यक्रमानुसार नव्याने प्राप्त होणाऱ्या आक्षेप व हरकतींवर सुनावणी देण्यात यावी, असे आदेशित केले आहे. जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, महाड, माथेरान, मुरुड जंजिरा, पेण, रोहा, श्रीवर्धन व उरण या नगरपरिषदांच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सादर करण्यात आलेल्या प्रारूप प्रभाग रचना, प्रभाग दर्शक नकाशे रहिवाशांच्या माहितीसाठी तसेच हरकती व सूचना मागविण्यासाठी कार्यक्रम जाहीर केला आहे.

# नांदगावमध्ये ३९ लाखाच्या विविध विकासकामांना प्रशासकीय मंजुरी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

आगामी काळात होणाऱ्या निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची घौडदौड असून मुरुड तालुक्यात पक्षाच्या माध्यमातून विविध विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

यामध्ये नांदगाव वाघोबा मंदिर ट्रस्ट व कोळी समाजासाठी ३९ लाखांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून राज्याच्या राज्यमंत्री तथा रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु आदिती तटकरे यांनी नुकतीच नांदगावला भेट देऊन या कामांची प्रशासकीय मंजुरी पत्र मान्यवरांच्या उपस्थितीत तालुका अध्यक्ष मंगेश दांडेकर यांना प्रदान करण्यात आले आहे.

नांदगाव वाघोबा मंदिर निवारा शेड व रस्ता, नांदगाव– वाघोबा मंदिर सुशोभीकरण, नांदगाव कोळीवाडा स्मशान भूमी बांधणे, व्यायामशाळा, मच्छिओटा बांधणे व शंकर मंदिर येथे येथे गणपती विसर्जन घाट बांधणे इ.विविध विकास कामांचा यात समावेश असून सदर कामाच्या प्रशासकीय मंजुरी चे पत्र पालकमंत्री कु आदिती तटकरे यांच्या हस्ते नांदगाव येथे प्रदान करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्षा सौ.स्मिता खेडेकर, तालुका अध्यक्ष मंगेश दांडेकर, योगेंद्र गोयजी, लहू रावजी, सदानंद तरे, महेश मापगांवकर, योगेश पाटील, सागर देवळेकर, नरसिंह मानाजी, भाऊ घुमकर मान्यवर उपस्थित होते.

# शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी पालक-विद्यार्थ्यांनी जुनपुर्वीच आवश्यक दाखले काढून घेण्याचे आवाहन

**दै.रायगड नगरी । उरण**

सुट्टी,सण–समारंभासाठी वेळ न दवडता पालकांनी जुनमध्ये होणारी धावपळ टाळण्यासाठी पाल्यांना शैक्षणिक कामांसाठी लागणारे विविध प्रकारचे दाखले तात्काळ काढून तहसिल कार्यालयाला नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन उरणचे निवासी नायब तहसिलदार जी.बी.धुमाळ यांनी केले आहे.

विशेषतः १० वी १२ वी पदवी प्राप्त अभ्यासक्रम व पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना उत्पन्न, जातीचे, नॉनक्रिमिलेअर आदी विविध दाखल्यांची गरज भासते. जुन महिन्यांपासून निकाल,शाळा महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्यावर मात्र पालक विद्यार्थ्यांची विविध प्रकारच्या आवश्यक दाखल्यांसाठी धावपळ सुरू होते. मे महिना सुट्टी सण–समारंभाचा काळ असल्याने पालक, विद्यार्थींचा कल सुट्टीत मौजमजा करण्यात अधिक असतो.

मात्र सुट्टी,सण–समारंभासाठी वेळ न दवडता पालकांनी जुनमध्ये होणारी धावपळ टाळण्यासाठी मे महिन्यांपासूनच पालक, विद्यार्थ्यांनी उत्पन्न, जातीचे, नॉनक्रिमिलेअर आदी विविध आवश्यक दाखल्यांसाठी अर्ज दाखल करुन दाखले मिळविण्यासाठी प्रयत्न केल्यास त्यांना आवश्यक दाखले वेळेत मिळतील.त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानही टाळता येईल.

जुन महिन्यात नैसर्गिक आपत्ती आणि इतर तत्सम कामांमुळे तहसिल कार्यालयावर अतिरिक्त ताण पडतो. यामुळे दाखले मिळविण्यासाठी विलंब तर होतोच.शिवाय विलंबामुळे विद्यार्थ्यांना नाहक शैक्षणिक नुकसानीला सामोरे जावे लागते.विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी पालक–विद्यार्थ्यांनी मे महिन्यात दाखले काढून तहसील कार्यालयाला सहकार्य करण्याचे आवाहन उरणहे निवासी नायब तहसिलदार जी.बी.धुमाळ यांनी केले आहे.

# सुतारवाडी परिसरात लवकरच प्राथमिक आरोग्य केंद्र उभारले जाईल : खा.सुनील तटकरे

**दे.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

रोहा तालुक्यातील सुतारवाडी परिसरात लवकरच प्राथमिक आरोग्य केंद्र उभारले जाईल तसेच याबाबत पालकमंत्री अदितीताई तटकरे यांनी या कामासाठी मंजुरी दिली असून लवकरच कामाची निविदा निघून कामाला सुरुवात होणार असल्याचे खासदार सुनिल तटकरे यांनी येथे विविध विकास कामांचे उद्घाटन आणि भूमिपूजनाच्या शुभारंभाच्या वेळी सांगितले.



या ठिकाणी भव्य असा वनौषधी उद्यान सुद्धा लवकरच होणार असून वनऔषधी उत्पादन पाहण्यासाठी देशाच्या काना कोपऱ्यातील पर्यटक या ठिकाणी येथील असा विश्वास खासदार सुनिल तटकरे यांनी यावेळी व्यक्त केला.

सुतारवाडी परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्र झाल्यानंतर हजारो नागरिकांना फायदा होईल. सुतारवाडीसह येरळ, धगडवाडी, विजयनगर, कामथ, सावरवाडी, ढोकलेवाडी, जामगाव, जाधववाडी, पाथरशेत, जावटे, कुडली, अंबिवली, दुरटोली, नारायणगाव, अनेक ठिकाणच्या आदिवासीवाड्या आदिंना लाभ घेता येईल.

सध्या सुतारवाडी येथे उपकेंद्र आहे आणि कोलाड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. एखादी व्यक्ती आजारी पडली किंवा अपघात झाला तर दहा ते पंधरा कि.मी. अंतर पार करुन कोलाड प्राथमिक आरोग्य केंद्रात जावे लागते.

त्यामुळे रुग्णांचे किंवा अपघात ग्रस्तांचे खूपच हाल होतात. मात्र आता या समस्या लवकरच मार्गी लागणार असल्याने नागरिकांनी खासदार सुनिल तटकरे तसेच रायगडच्या पालकमंत्री अदितीताई तटकरे आणि आमदार अनिकेत तटकरे यांना धन्यवाद दिले. रात्री अपरात्री विंचू किंवा सर्पदंश झालेल्यांना कोलाड येथील प्राथमिक आरोग्यकेंद्र गाठावे लागत असे. यापुढे ही समस्या ही आता दूर होणार असल्यामुळे ग्रामीण भागातील असंख्य नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

# राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये १८ हजार ६६५ प्रकरणे निकाली

## ९ कोटी ९१ लाख ६१ हजार १३ रूपयाची तडजोड रक्कम वसूल

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

न्यायालयात वर्षानुवर्षवाद करीत वेळ, पैसा आणि ताकद खर्च करण्यापेक्षा दोन्ही पक्षांनी सामंजस्याची भूमिका घेवून लोकन्यायालयात समेट घडवावा, असा प्रवाह भारतीय न्यायालयांच्या इतिहासात गेल्या दशकात प्रकर्षाने रूढ झालेला आहे. दि.०७ मे २०२२ रोजी रायगड जिल्ह्यात झालेल्या लोकन्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली असून वादपूर्व व दाखल अशी एकूण १८ हजार ६६५ प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आले आहे, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश संदीप स्वामी यांनी दिली आहे.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे तसेच न्यायालयात दाखल होण्यापूर्वीची प्रकरणे ठेवण्यात आली होती.

रायगड जिल्ह्याच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विभा इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यामध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील दाखलपूर्व व प्रलंबित अशी एकूण ८० हजार २९० प्रकरणे लोकअदालतीमध्ये ठेवण्यात आली होती.

त्यापैकी दाखलपूर्व १७ हजार ८९३ व प्रलंबित प्रकरणांपैकी ७७२ प्रकरणे अशी एकूण १८ हजार ६६५ प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोक अदालतीमध्ये निकाली निघाली व त्याद्वारे पक्षकारांना एकुण ९ कोटी ९१ लाख ६१ हजार १३ रूपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली.

अलिबाग येथील लोकन्यायालयात ३ जोडप्यांचा ज्यामध्ये जेष्ठ नागरिक पती–पत्नी होते. त्यांचा आपसातील वाद सामंजस्याने मिटल्यामुळे संबंधित पत्नी हसतमुखाने नांदायला गेली. त्या पक्षकारांचा पॅनलवरील न्यायाधीशांनी पुष्पगुच्छ देवून सत्कार केला व त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

रायगड जिल्ह्यातील विविध न्यायालयांत ४३ लोकअदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. लोकअदालतीमध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलचा वापर करूनसुध्दा काही प्रकरणे मिटविण्यात आली.

या लोकन्यायालयाला यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायिक अधिकारी, वकील वर्ग, रायगड जिल्हा परिषद, रायगड पोलीस अधिक्षक व सर्व पोलीस कर्मचारी, सर्व पक्षकार यांनी भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विभा इंगळे व न्यायाधीश तथा सचिव संदीप स्वामी यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.